PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Sanga Hya Vedila
Lyricist: Ga. Di. Madgulkar

अहो सांगा ह्या वेडीला
माझ्या गुलछडीला
सांगा ह्या वेडीला
माझ्या गुलछडीला
हिच्यासाठी आलो मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडीला

तुला न्यावयाला गं घेऊन गाडी
आलो सर्व सोडून मी शेतवाडी
तू असताना जोडीला
या बुरख्याच्या गाडीला
नवा रंग येईल गुलाबी साडीला
सांगा ह्या वेडीला

अहो सांगा ह्या वेडयाला
माझ्या घरधन्याला
कशी जाऊ सांगा मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडयाला

ही गाडी कुणाची शेतवाडी कुणाची
बढाई नका ठोकू मोठेपणाची
सांगा या खोपडीला
ना ठिकाणा झोपडीला
कशी जाऊ सांगा मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडयाला

अहो सांगा ह्या वेडीला
माझ्या गुलछडीला
हिच्यासाठी आलो मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडीला

बरे नाही तुझे हे माहेरी राहणे
तू गावात बदनाम होशील याने
तुझ्या वाडवडीलां अन् धर्म रूढीला
हे घातक होईल पुढच्या पिढीला
सांगा ह्या वेडीला

अहो सांगा ह्या वेडयाला
माझ्या घरधन्याला
कशी जाऊ सांगा मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडयाला

आहे थोरवी थोर माझ्या पिढीची
भले आज गावात इज्जत पित्याची
आहे मान त्याला
अन् त्याच्या पगडीला
अरे हसतील सारे
तुझ्या रे परवडीला

सांगा ह्या वेडयाला
अहो सांगा ह्या वेडीला
माझ्या गुलछडीला
हिच्यासाठी आलो मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडीला

नको भांडू
भांडण विकोपास जाईल
तुझा माझा तंटा मी

पंचात नेईल
बसेन चावडीला
त्या पंचाच्या जोडीला
तुला मात्र नेईन मी
याच घडीला
सांगा ह्या वेडीला

माझ्या गुलछडीला
हिच्यासाठी आलो मी सासुरवाडीला
सांगा ह्या वेडीला
अहो सांगा ह्या वेडयाला
अहो सांगा ह्या वेडीला
अहो सांगा ह्या वेडयाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*